—: **प्रेसनोट** :— दिनांक:— २७/०५/२०२२

**यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादी यांच्या पतीविरोधात दाखल गुन्हयात मदत करतो असे सांगुन रु. २५,०००/— लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती रु. १३,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २७/२०२२ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | हरीभाऊ केरुजी बानकर, वय ५४ वर्षे, पद —पोलीस निरीक्षक (प्रशासन), देवनार पोलीस ठाणे, गोवंडी (पुर्व), मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १३,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे पती यांच्याविरोधात दिनांक २१/०५/२०२२ रोजी देवनार पोलीस ठाणेत विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात फिर्यादी यांच्या पतीस मदत करतो तसेच गुन्हयातील नांव कमी करतो, असे सांगुन यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादी यांचेकडे रु. २५,०००/— लाचेची मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून आरोपीत लोकसेवक यांचे विरोधात लेखी तक्रार दिली होती.<br>प्राप्त तक्रारीनुसार दिनांक २६/०५/२०२२ रोजी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक हरीभाऊ केरुजी बानकर यांनी तडजोडीअंती रु. १३,०००/— स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपीत लोकसेवकास फिर्यादी यांचेकडुन रु. १३,०००/— स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून आरोपीत लोकसेवकाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

27/05/22

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८

वेबसाईट — acbmaharashtra.gov.in,ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल : — addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :— www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईलअॅप:—www.acbmaharashtra.net